पुण्यनगरी दि: ०८/०८/२०२२

# सायबर सेलने मिळवून दिले ७ लाख रुपये

**नांदेड / प्रतिनिधी**

जिल्ह्यातील नागरिकांना वीज वितरण कंपनीकडून बोलत असल्याचे सांगून त्यांच्याकडून वीज बिलाची रक्कम जमा करण्यासाठी तंबी देण्यात आली. वीज बिलाची रक्कम जमा केल्यानंतर नागरिकांची फसवणूक झाल्याचे लक्षात आले. या प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले होते. दरम्यान जिल्ह्यातील सायबर सेलने संबंधिताचा युपीआय नंबर, व्हॅलेट व मर्चंटचा तपास करुन तब्बल वीज वितरण कंपनीच्या ग्राहकांचे ७ लाख ४ हजार ६११ रुपयांची रक्कम परत खात्यात जमा करण्यात आली. सायबर सेलच्या या कामगीरीचे कौतुक होत आहे.

जुलै २०२२ मध्ये नांदेड जिल्ह्यात महावितरणचे वीज बिल भरण्यासाठी खोटे मेसेज पाठवून, ग्राहकांना लिंक पाठवून वरील पैसे जमा करुन घेण्यात आले होते. कुरियरने मागवलेले पार्सल आले नाही. दरम्यान ग्राहकांनी कंपनीचा ऑनलाईन कस्टमर केअर नंबर गुगलवर सर्च करून त्यावर चौकशी केली. संबंधित मोबाईल क्रमांक फ्रॉड असल्याचे दिसून आले. यावरुन फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर ४ जणांकडून सायबर सेल पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नानासाहेब उबाळे, पोलीस उपनिरीक्षक थोरवे, दळवी, पोलीस नाईक राठोड, शेवाळे, स्वामी यांनी याबाबत सविस्तर माहिती घेतली. तात्काळ बँक, यूपीआय नंबर, वॉलेट - मर्चंट यांना मेल करून पाठपुरावा करण्यात आला. ही रक्कम बँकेत प्रथम होल्ड -फ्रिज करण्यात आली. त्यानंतर संबंधित व्यक्तींच्या खात्यात जमा झाली आहे. पोलीस अधीक्षक प्रमोद कुमार शेवाळे, अपर पोलीस अधीक्षक विजय कबाडे, निलेश मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर टीमला ८ लाख ६४ हजार ६११ रुपयांपैकी ७ लाख ४ हजार ६११ रुपये परत मिळविण्यात यश आले.

या पार्श्वभूमीवर सर्व नागरिकांनी ऑनलाईन फसवणूक झाल्यास तात्काळ नॅशनल सायबर क्राईम हेल्पलाइन १९३० वर संपर्क करावा. तसेच संबंधित पोलीस ठाणे व सायबर पोलीस ठाण्यात फसवणुकीबाबत माहिती द्यावी, कोणत्याही अनोळखी व्यक्तीला कॉलवर आपले बँकेचे डिटेल्स सांगू नयेत, कोणत्याही प्रकारचे ओटीपी सांगू नयेत, अनोळखी व्यक्तीने दिलेल्या लिंकवर क्लिक करु नये आणि ऑनलाईन कस्टमर केअरचा नंबर शोधतांना वेब साईटची सत्यता पडताळुनच व्यवहार करावा व आपण सायबर क्राईमला बळी पडण्यापासून सुरक्षित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

---

सामना. ८.८.२२

# ऑनलाईन फसवणुकीतील सात लाख परत मिळवून दिले

## तात्काळ रक्कम फ्रीझ केली

नांदेड, दि. ७ (प्रतिनिधी) - वीज वितरण कंपनीचे बिल भरण्याचा खोटा मेसेज पाठवून ८ लाख ६४ हजार ६११ रुपयांच्या ऑनलाईन फसवणुकीचा छडा नांदेड पोलिसांच्या सायबर सेलने लावला. यातील ७ लाख ४ हजार ६११ रुपये पोलिसांनी परत मिळवून दिले आहेत.

वीज वितरण कंपनीचे बिल भरण्याचा खोटा मेसेज पाठवून कुरिअरने मागविलेले पार्सल न आल्याने कंपनीच्या ऑनलाईन कस्टमर केअर नंबरवर लावल्यानंतर हा नंबर खोटा असल्याचे निष्पन्न झाले. या नंबरद्वारे ८ लाख ६४ हजार ६११ रुपयांची फसवणूक झाली होती.

या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर सायबर सेलचे पोलीस निरीक्षक नानासाहेब उबाळे, पोलीस निरीक्षक थोरवे, दळवी, राठोड, शेवाळे व स्वामी यांनी याबाबत माहिती घेऊन संबंधित बँक, यूपीआय वॉलेट यांना मेल करून पाठपुरावा केला. त्यामुळे ऑनलाईन फसवणूक झालेली रक्कम फ्रीझ करण्यात आली. त्यातील ७ लाख ४ हजार ६११ रुपये परत मिळविण्यात सायबर सेलला यश आले आहे.